आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२९ जुलै २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पेपरफुटीप्रकरणी कठोर शिक्षेची तरतूद असलेल्या विधेयकाला लोकसभेची मंजुरी, वंदे मातरमचा अवमान करणाऱ्यांना ३ वर्षांपर्यंत शिक्षा ठोठावणाऱ्या विधेयकाला राज्यसभेची मान्यता

- कोळसा खाण घोटाळ्याप्रकरणी माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग निर्दोष असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- महाराष्ट्रात शाळांपासून ५० मीटरच्या अंतरावर पाकिटबंद खाद्यपदार्थ आणि शीतपेय विक्रीवर FDA चे निर्बंध

- सव्वा २ कोटी रुपयांचं बक्षीस असलेला नक्षलवादी मिसिर बेसराला झारखंडमध्ये अटक

**आणि**

- जपानमध्ये भूकंपात १८ जणांचा मृत्यू, ६२ जण जखमी

**<><><><><>**

पेपर फुटीप्रकरणी कठोर कारवाईची तरतूद असलेलं सुधारणा विधेयक लोकसभेत आज मंजूर झालं. राज्यसभेत वंदे मातरमचा अवमान करणाऱ्यांच्या विरोधात कारवाईची तरतूद असणारं विधेयक मंजूर झालं. संसदेच्या आजच्या कामकाजाविषयी जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून

**कॅप्सूल**

*(सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्ग प्रतिबंध) सुधारणा विधेयकावरच्या चर्चेदरम्यान देशातली शिक्षण व्यवस्था अतिशय महाग झाल्याचं विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले. यावेळी त्यांनी काही असंसदीय शब्दांचा वापर केल्याचं सांगत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी गोंधळ घातला आणि त्यांच्या भाषणात अडथळे आणले. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर झालेल्या हिंसाचाराचे आदेश कोणी दिले यासंदर्भात राहुल गांधी यांनी केलेल्या दाव्यांवरुनही सत्ताधाऱ्यांनी आक्षेप घेतले. याविधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी विधेयकातल्या कठोर तरतुदींचा पुनरुच्चार केला. तसंच विरोधी पक्षांनी केलेले आरोप फेटाळून लावले. दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या कायद्याच्या अंतर्गत पेपरफुटीप्रकरणी ५२ गुन्हे दाखल झाल्याची माहिती त्यांनी दिली. या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेले दावे त्यांनी फेटाळून लावले. आंदोलक विद्यार्थ्यांवर गोळीबार झाला नसून केवळ अश्रुधूर सोडल्याचं ते म्हणाले.*

**होल्ड - जितेंद्र सिंग**

*सत्ताधारी आणि विरोधकांच्या गोंधळातच हे विधेयक मंजूर झालं आणि त्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब केलं. त्यापूर्वी जन्म-मृत्यूच्या उशिरा होणाऱ्या नोंदी संदर्भातलं विधेयक गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत सादर केलं. २ वर्षांपेक्षा अधिक कालावधीनंतर जन्म किंवा मृत्यूची नोंदणी करायची असेल तर प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांची मंजुरी आवश्यक असेल. सध्या एक वर्षापेक्षा अधिक कालावधीनंतर जन्म-मृत्यूची नोंद होणार असेल तर जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी आवश्यक असते. राज्यसभेत आज वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला जन गण मन या राष्ट्रगीताप्रमाणे सन्मान देण्याची तरतूद असलेलं विधेयक मंजूर झालं. याअंतर्गत वंदे मातरमचा अवमान करणाऱ्यांनाही ३ वर्षांपर्यंत शिक्षा आणि दंड अशी तरतूद आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर विरोधकांचा गोंधळ सुरू राहिल्यानं सभागृहाचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.)*

**<><><><>**

कोळसा खाण वाटप घोटाळा प्रकरणी माजी प्रधानमंत्री दिवंगत मनमोहन सिंह यांना निर्दोष ठरवत त्यांच्या विरोधातला फौजदारी खटला सर्वोच्च न्यायालयानं आज बंद केला. सीबीआयनं दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट विशेष न्यायालयानं फेटाळल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. मनमोहन सिंग, उद्योजक कुमार मंगलम बिर्ला आणि माजी कोळसा सचिव पी. सी. पारेख यांना ओडिशातल्या तालाबिरा-२ या कोळसा खाण वितरण प्रकरणी विशेष न्यायालयानं बजावलेलं समन्सही सर्वोच्च न्यायालयानं रद्द केलं.

**<><><><>**

वाघांचं संवर्धन हे फक्त एका प्राण्यापुरतं मर्यादित नाही, तर संपूर्ण परिसंस्थेचं रक्षण करणं आणि निसर्गाशी असलेलं भारताचं गहिरं नातं जपणं यात अंतर्भूत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय वनं मंत्री भूपेंद्र यादव यांनी आज केलं. जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्तानं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- भूपेंद्र यादव***

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणानं विकसित केलेल्या निसर्गस्नेही पर्यटनाच्या वेब पोर्टलचं अनावरण यादव यांच्या हस्ते आज झालं. सर्व व्याघ्र प्रकल्पांची माहिती एकाच मंचावर आणून त्याद्वारे जनजागृती आणि संतुलित पर्यावरणाला चालना देण्याचा या पोर्टलचा उद्देश आहे.

**<><><><>**

नैसर्गिक अधिवास कायम राखत वैज्ञानिक दृष्टिकोनातून राज्यात व्याघ्र संवर्धनाची अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे देशातले सर्वाधिक वाघ राज्यात

असतील अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त नागपूरात आयोजित कार्यक्रमात बोलताना व्यक्त केली.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट (३२ सेकंद)**

**<><><><>**

राज्यातल्या सर्व शाळांच्या ५० मीटर परिसरात साखर, मीठ आणि मेद यांचं अतिरिक्त प्रमाण असलेल्या पाकीटबंद खाद्यपदार्थ आणि पेयांच्या विक्रीवर अन्न आणि औषध प्रशासनाने बंदी घातली आहे. या आदेशाची कठोरपणे अंमलबजावणी केली जाईल, असं आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज वार्ताहरांना सांगितलं. अन्न सुरक्षा नियमांनुसार प्रत्येक शालेय स्वयंपाकघर चालकाकडे आणि शाळांना अन्न पुरवणाऱ्यांकडे परवाना असणं आवश्यक असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><>**

ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला एसटी महामंडळानं १ महिन्याची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळं या नागरिकांनी एसटी प्रवास सवलतीसाठी १ सप्टेंबरपासून NCMC स्मार्ट कार्ड आवश्यक असेल. तोपर्यंत सध्या सुरु असलेल्या सवलतीचा लाभ घेता येईल.

**<><><><>**

सीपीआय माओवादी या बंदी घातलेल्या संघटनेचा सदस्य मिसिर बेसरा याला झारखंडमध्ये धनबाद जिल्ह्यातून अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर सव्वा २ कोटी रुपयांचं बक्षीस होतं आणि १४१ गुन्ह्यांमध्ये तो हवा होता. बेसरा याच्यासह अन्य दोन नक्षलवाद्यांनाही अटक करण्यात आली असून त्यापैकी एकावर १५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. झारखंड आणि शेजारच्या राज्यांमध्ये नक्षलवादी जाळ्याचा विस्तार करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

दरम्यान, झारखंडमध्ये सक्रिय असलेल्या ८ नक्षलवाद्यांनी आज छत्तीसगडमध्ये विजापूर जिल्ह्यात पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. त्या सर्वांवर मिळून ४९ लाख

रुपयांचं बक्षीस होतं. शरणागती पत्करलेल्या या ८ जणांमध्ये ५ महिलांचा समावेश आहे. शरणागती पत्करलेले हे नक्षलवादी विजापूर, नारायणपूर आणि सुकमा जिल्ह्यांतले रहिवासी आहेत.

<><><><>

एनएमसी, अर्थात राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानं एमबीबीएसच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दिव्यांग व्यक्तींच्या मूल्यांकनाची पद्धत बदलली आहे. यात अपंगत्वाच्या टक्केवारीऐवजी योग्य मदतीच्या सहाय्यानं संबंधित उमेदवार अभ्यासक्रम पूर्ण करू शकतो का याला प्राधान्य दिलं जाणार आहे. नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एमबीबीएस प्रवेशासाठी उमेदवारांची पात्रता अपंगत्व मूल्यांकन मंडळानं केलेल्या कार्यक्षमतेच्या चाचणीच्या आधारे ठरवली जाईल.

<><><><>

जपानच्या कुमामोतो भागात काल झालेल्या भूकंपात किमान १८ जण मृत्यूमुखी पडले आहेत. भूकंपामुळे जमीनदोस्त झालेल्या ठिकाणी मदत आणि बचावकार्य सुरू आहे. ७ पूर्णांक १ दशांश रिश्टर स्केलच्या या भूकंपात किमान ६२ जण जखमी झाले असून त्यापैकी ६ जणांची प्रकृती गंभीर आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज आसाममधल्या पूरस्थितीचा आढावा घेतला आणि सर्व प्रकारच्या मदतीचं आश्वासन दिलं. आसाममधल्या पूरग्रस्त जिल्ह्यांपैकी सर्वाधिक फटका बसलेल्या शिवसागर, गोलाघाट, चराईदेव आणि जोरहाट या जिल्ह्यांमध्ये मदत आणि पुनर्वसनाचं काम युद्धपातळीवर सुरू आहे.

<><><><>

ग्लासगो इथं सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत १२ पदकं मिळवली आहेत. यात २ सुवर्ण, ७ रौप्य आणि ३

कांस्यपदकांचा समावेश आहे. भारताचे बॉक्सर्स अंकुश जाधव, अरुंधती चौधरी, साक्षी चौधरी आणि सचिन सिवाच यांनी आपापल्या गटांमध्ये उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. लोव्हलीना बोर्गोहाइन, प्रीती पवार, प्रिया घंघस आणि जदुमनी सिंह यांनी यापूर्वीच उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं होतं. यामुळे या गटांमध्ये भारताची ८ पदकं निश्चित झाली आहेत.

**//<><><><><>//**